आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र – सायं. ७.०० वाजता
२ मार्च  २०२१ – मंगळवार

<u>ठळक बातम्या</u>

- शेतकरी बांधवांना दिवसा आणि पुरेशी वीज देण्याच्या दृष्टीनं महाकृषी ऊर्जा अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे निर्देश
- शेतकऱ्यांचे कृषीपंप आणि वीज ग्राहकांच्या थकबाकीसंदर्भात विधीमंडळात चर्चा होऊन निर्णय होईपर्यंत कुणाचीही वीज जोडणी न कापण्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विधानसभेत निर्देश
- राज्यात फळबाग लागवडीसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, अशी कृषी मंत्री दादाजी भुसे यांची विधानपरिषदेत ग्वाही
- हे सरकार संवेदनशील नसल्याचा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडनवीस यांचा आरोप
- तीन दिवसीय मेरीटाईम परिषदेचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन/ सागरी अर्थव्यवस्थेला चालना देण्यात भारत मोठं यश मिळवेल, असा प्रधानमंत्र्यांना विश्वास

  आणि
- मुंबई शेअर बाजारात आजही तेजी कायम/ निर्देशांकात ४४७ अंकांची वाढ

<><><><>

शेतकरी बांधवांना दिवसा आणि पुरेशी वीज देणे शासनाची प्राथमिकता असून महाकृषी ऊर्जा अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज दिले.

महा कृषी ऊर्जा अभियानांतर्गत कृषी ऊर्जा पर्वाचा प्रारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विधानभवनात झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत, ऊर्जा राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे आदी उपस्थित होते.

इतरांसाठी मळे फुलवणाऱ्या शेतकऱ्यांच्या आयुष्यात काटे येऊ नयेत यासाठी त्यांच्या आणि त्यांच्या कटुंबियांच्या मागे सरकार ठामपणे उभे राहील, अशी ग्वाही देखील ठाकरे यांनी दिली.

शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्याला आमचं प्राधान्य असून नुकत्याच नीती आयोगासोबत झालेल्या दृकश्राव्य बैठकीत पीक विम्याचा प्रश्न उपस्थित केला असल्याचंही त्यांनी सांगितलं.

वीजबील थकलेल्या सर्व शेतकऱ्यांनी थकीत वीजबिलांवर सूट मिळवण्यासाठी नवीन कृषी वीज जोडणी धोरणांतर्गत जाहीर केलेल्या योजनेचा लाभ घ्यावा, असं आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी केलं. त्याचबरोबर शेतकरी, घरगुती वीज ग्राहक आदी सर्वांनाच व्यवस्थित वीज मिळाली पाहिजे यासाठी सर्वांनी वीजबिले भरणं आवश्यक आहे, वीजगळती होणार नाही याकडेही लक्ष देणं गरजेचं आहे, असंही ते म्हणाले.

कृषी ऊर्जा पर्वा अंतर्गत 14 एप्रिलपर्यंत विविध उपक्रमांचं आयोजन केलं आहे. त्यात महा कृषी अभियानाची माहिती सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल यासाठी व्यापक प्रचार प्रसिद्धी केली जाणार आहे. कोरोना निर्बंधांचे पालन करत कृषी वीज ग्राहकांचा मेळावा, ग्राहक संपर्क अभियान, ग्रामपंचायत, ग्रामसभेत प्रबोधन करणे, थकबाकी भरणाऱ्या महिलांचा सत्कार, महिलांच्या नावावर वीज जोडणी देणे, थकबाकीमुक्त शेतकऱ्यांना सन्मानपत्र आणि थकबाकीमुक्त गावांच्या सरपंचांचा सन्मान, शेतकऱ्यांच्या बांधावर महावितरण अंतर्गत वीजजोडणी आणि सौर कृषिपंप बसवणं, कृषी आकस्मिकता निधीतून पायाभूत सुविधांच्या कामाची सुरूवात, तसंच वीज सुरक्षा आणि कपॅसीटरचा प्रसार आदी उपक्रम राबवले जाणार आहेत.

<><><><>

राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल त्यांचे आभार मानणाऱ्या प्रस्तावावरच्या चर्चेला आज विधानसभेत सुरुवात झाली. शिवसेनेचे सुनील प्रभू यांनी चर्चेला सुरुवात केली. कोरोनाच्या काळात महसुलात मोठी घट झाली, केंद्राकडून जीएसटी ची वाढलेली थकबाकी असूनही शेतकऱ्यांना दिलासा देण्याचं काम सरकारनं केलं, असंही त्यांनी सांगितलं.

या चर्चेत सहभागी होताना विरोधी पक्षनेते देवेंद्र फडनवीस यांनी सरकारवर टीकास्त्र सोडलं. हे सरकार संवेदनशील नसल्याचा आरोप त्यांनी केला. संकटकाळात शेतकऱ्यांना सरकारनं मदत दिली नाही, राज्यात शिक्षणाचा बट्ट्याबोळ झाला आहे, मनमानी कारभार चालू आहे, कायदा आणि सुव्यवस्था कोलमडली आहे. पूजा चव्हाण मृत्यूप्रकरणी कारवाई का नाही असा सवाल त्यांनी केला.

शेतकऱ्यांचे कृषीपंप आणि वीज ग्राहकांच्या थकबाकीसंदर्भात विधीमंडळात चर्चा होऊन निर्णय होईपर्यंत कुणाचीही वीज जोडणी कापू नये, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. विधीमंडळ अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी आज विधानसभेत प्रश्नोत्तराचा तास स्थगित करून विजेवर चर्चा घेण्याचा आग्रह विरोधी पक्षनेते देवेंद्र फडनवीस यांनी धरला. त्यावर वीज थकबाकी संदर्भात विशेष बैठक आयोजित करुन चर्चा करण्याची सरकारची तयारी असल्याचं उपमुख्यमंत्र्यांनी सांगितलं. वीज जोडणी कापण्याच्या मोहिमेला स्थगिती दिल्याबद्दल फडनवीस यांनी उपमुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

<><><>

राज्यात फळबाग लागवडीसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, अशी ग्वाही कृषी मंत्री दादाजी भुसे यांनी आज विधानपरिषदेत दिली. प्रसाद लाड यांनी प्रश्नोत्तराच्या तासात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते.

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत २१७ कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असून त्यापैकी १०३ कोटी रुपये वितरित केले आहेत, असं त्यांनी सांगितलं. कोकणात चक्रीवादळामुळे ज्यांचं नुकसान झालं आहे त्यांच्यासाठी विशेष बाब म्हणून शासनानं ६०९ कोटी रुपयांचं पॅकेज दिलं. कोरोना संकटाच्या काळातही शासनानं फळबाग लागवडीचं काम सुरूच ठेवलं असून येत्या वर्षभरात ५० हजार हेक्टरवर फळबाग लागवडीचं उद्दिष्ट ठेवलं असल्याची माहितीही भुसे यांनी दिली.

सार्वजनिक आरोग्य विभागानं रिक्त पदं भरण्यासाठी घेतलेल्या परीक्षेसंदर्भात काही आक्षेप आहेत, त्यासंदर्भात सोमवारी योग्य तो निर्णय घेतला जाईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानपरिषदेत दिली.

राज्यात ज्या पोलिस स्टेशनच्या हद्दीत हुक्का पार्लर सुरू असेल तिथल्या संबंधित पोलिस अधिकाऱ्याला जबाबदार धरून त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असं गृहमंत्री अनिल देशमुख यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. वरळी इथं पबमध्ये झालेली गर्दी आणि कोरोनाच्या नियमांचं झालेलं उल्लंघन याबाबत दोन दिवसांत चौकशी केली जाईल, आणि त्याचा अहवाल आल्यावर योग्य ती कारवाई केली जाईल, असे गृहमंत्र्यांनी सांगितले.

<><><>

लसीकरणाच्या दुसऱ्या टप्प्याला जनता चांगला प्रतिसाद देत आहे. आत्तापर्यंत महाराष्ट्रात १२ लाख २८ हजार आणि २११ लाभार्थ्यांचे लसीकरण पूर्ण झालं आहे.

६ लाख ६६ हजार आरोग्य कर्मचाऱ्यांना लस देण्यात आली आहे. त्यात १ लाख ७० हजार आरोग्य कर्मचाऱ्यांना लसीची दुसरी मात्रा दिली आहे.

राज्यात आत्तापर्यंत ३ लाख ८८ हजार आघाडीच्या कोरोनायोद्ध्यांचं लसीकरण पूर्ण झालं आहे. याशिवाय मुंबईत काल ४५ ते ६० वर्षांवरील नागरिकांना लस देण्यात आली. १ हजार ७२२ ज्येष्ठ नागरिक आणि ४५ वर्षांवरील २६० सहव्याधी नागरिकांना काल लस दिल्याची माहिती मुंबई महानगर पालिकेनं दिली. तर राज्यात एकूण ६ हजार ७०० ज्येष्ठ नागरिक आणि ४५ वर्षांवरील आणि विविध आजारांनी ग्रस्त नागरिकांना काल लस देण्यात आली.

<><><>

सागरी अर्थव्यवस्थेला चालना देण्यात भारताला मोठं यश मिळवेल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. ते आज दुरदृश्य प्रणालीद्वारे तीन दिवसीय मेरीटाईम इंडिया समिटचं उद्घाटन करतांना बोलत होते. जागतिक समुदायानंही देशाच्या या

विकासाचा भाग व्हावं, असं आवाहनही त्यांनी केलं. भारत या क्षेत्रात आता स्वाभाविक नेतृत्वाच्या स्थितीत पोहोचला असून देशातल्या बंदरांना जोडण्याचं मोठं काम झालेलं आहे, असंही ते म्हणाले. आपलं सरकार देशात पायाभूत सुविधांच्या विकासावर भर देत असून सागरी अर्थव्यवस्थेच्या विकासावरही भर देत असल्याचं, त्यांनी सांगितलं.

<><><><>

येत्या ८ मार्चला जगभरात जागतिक महिला दिन साजरा होईल.. यानिमित्तानं महिला सक्षमीकरणाच्या संबंधी विविध मुद्यांवरची चर्चा निश्चितच महत्वाची ठरते.. त्याच अनुषंगानं समाजातल्या स्त्री पुरुष भेदभावासंदर्भातली बदलती स्थिती आणि अपेक्षा याविषयी सामाजिक कार्यकर्त्या उर्मिला आपटे यांनी आकाशवाणीला सांगितलं…

होल्ड......बाईट - उर्मिला आपटे

<><><><>

श्री काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह स्मृती दिनानिमीत्त आज मंदिरात कोरोना नियमांचं पालन करत विविध कार्यक्रमांचं आयोजन केलं होतं. नाशिकचे माजी महापौर अशोक दिवे, रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश लोंढे यांच्यासह अनेक स्थानिक लोकप्रतिनिधींनी या कार्यक्रमांना हजर राहून अभिवादन केलं. हा लढा मानव मुक्तीच्या लढ्यातला महत्वाचा टप्पा मानला जातो. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २ मार्च १९३० नाशिक इथल्या श्री काळाराम मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह केला होता. त्यानिमीत्त दरवर्षी हा स्मृतीदिन पाळला जातो.

<><><><>

जागतिक शेअर बाजारातल्या तेजीमुळे मुंबई शेअर बाजारात आजही गुंतवणूकदारांमधे खरेदीचा उत्साह दिसला. त्यामुळे दिवसअखेर निर्देशांकात ४४७ अंकांची वाढ झाली आणि तो ५० हजार २९७ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १५८ अंकांची वाढ नोंदवत १४ हजार ९१९ अंकांवर बंद झाला. मिड कॅप निर्देशांकात दीड टक्क्याची तर स्मॉल कॅप निर्देशांकात १ पूर्णांक ६ दशांश टक्के वाढ झाली.

<><><><>

पंधरा दिवसांपूर्वी ४ हजार रूपये क्विंटलवर पोहोचलेले कांद्याचे भाव गेल्या काही दिवसात २ हजार ४०० ते अडीच हजार रूपये क्विंटल असे घसरले आहेत. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी चिंतेत आहे

नाशिकच्या मनमाड कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मात्र कांद्याच्या भावात १०० रूपयांची वाढ झाली. तर सफेद कांद्याच्या भावात किंचित घसरण दिसून आली. आज या बाजार समितीच्या आवारात ४०१ ट्रॅक्टर इतकी कांद्याची आवक झाली.

लाल कांद्याला किमान एक हजार ते कमाल २ हजार ७४० रुपये, तर पांढऱ्या कांद्याला किमान ८६० ते कमाल १ हजार ३९० रूपये प्रति क्विंटल असा भाव मिळाला.

<><><><>

बुलडाणा जिल्हा भाजपचे जेष्ठ नेते आणि माजी जिल्हाध्यक्ष घनश्यामदासजी उपाख्य काकाजी गांधी यांचे आज पहाटे वृद्धापकाळानं निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. दुपारी जळगाव जामोद येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. सलग १० वर्षे ते भाजपचे जिल्हाध्यक्ष होते. भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे सुद्धा ते सदस्य होते. पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद विरोधी पक्षनेते अशा विविध पदांची जबाबदारीही त्यांनी सांभाळली होती.

<><><><>

'सागरी किनारा मार्ग' या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाअंतर्गत बोगद्याचं १०० मीटर पर्यंतचं खोदकाम नुकतंच पूर्ण झालं. या खोदकामासाठी 'मावळा' हे संयंत्र वापरलं जात आहे. याच संयंत्राच्या मदतीनं ४७ कंकणाकृती कडा उभारायचं कामही पूर्ण झालं आहे. सध्या अशाच तात्पुरत्या स्वरुपातल्या ७ कडा उभारल्या आहेत अशी माहिती महानगरपालिकेच्या पूर्व उपनगर क्षेत्राच्या आयुक्त अश्विनी भिडे यांनी दिली.

या प्रकल्पाअंतर्गतच्या दोन बोगद्याचं खोदकाम प्रियदर्शनी पार्क इथून केलं होतं. हे बोगदे प्रियदर्शनी पार्क ते नेताजी सुभाष मार्गालगत 'छोटा चौपाटी'पर्यंत खोदले जातील. दोन्ही बोगद्यांसाठी जमिनीखाली १० मीटर ते ७० मीटरपर्यंत खोदकाम केलं जात आहे. हे काम साधारण ९ महिन्यांमधे संपेल असं नियोजन असून, कामासाठी अतिरिक्त २ महिन्यांचा कालावधी ज़मेस धरला आहे.

<><><><>

आज संपूर्ण राज्यात हवामान कोरडे होतं. विदर्भाच्या बहुतांश भागात कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली. येत्या दोन दिवसात कोंकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पड्ण्याची शक्यता असून मराठवाडा आणि विदर्भात हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे.

//<><><><>//